## महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई ४०० ००१. दुरध्वनी क्र.- २२६२०२३१/३२.

**क्रमांक :-एसटीओ/२०१६-१७/चार/२९९६** **दिनांक :- १३.१२.२०१७**

**गोपनिय**

प्रति,
केंद्र प्रमुख / मुख्याध्यापक / प्राचार्य,
शासकीय रेखाकला परीक्षा -२०१७
संबंधित सर्व केंद्र.

विषय :- शासकीय रेखाकला परीक्षा – २०१७
निकाल प्रसिध्दीबाबत.

आपल्या केंद्राचे शासकीय रेखाकला परीक्षा -२०१७ चे निकाल प्रसिध्दीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे. सदर निकाल आपल्या केंद्रावर दिनांक **२१.१२.२०१७** रोजी खाली दिलेल्या पध्दतीने प्रसिध्द करावेत. सोबत आपल्या केंद्राची दुय्यम निकालपत्रके जोडली आहेत.

२. यशस्वी परीक्षार्थ्यांची परीक्षागणिक संपूर्ण यादी “अ”, “ब” व “क” श्रेणीनुसार तयार करुन सूचना फलकावर सर्व संबंधित परीक्षार्थ्यांच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी. आपल्या केंद्रावरील सहभागी शाळांचे तसेच खाजगी परीक्षार्थ्यांचे निकाल विहित नमुन्यात तयार करुन संबंधितांना पाठवावा. सहभागी शाळांच्या बाबतीत हा निकाल त्यांनी प्रवेशाच्या वेळी आपल्याकडे ज्या याद्या पाठविल्या आहेत. त्यामध्ये निकाल भरुन केंद्र प्रमुखाच्या स्वाक्षरीने संबंधितांना तातडीने पाठवावे. ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अनधिकृत आहेत, त्यांचे निकाल जाहीर करण्यात आलेले नाहीत. तसेच निकालपत्रकातील नावाप्रमाणेच यशस्वी परीक्षार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येतील.

३. प्रचलित नियमानुसार निकाल पडताळणीसाठी **प्रती विद्यार्थी रु.६०/- (अक्षरी एकूण साठ फक्त) प्रमाणे शुल्क आकारुन विहित रक्कमेच्या धनाकर्षासह ( डि.डि.)** योग्य तो अर्ज संबंधित केंद्रमार्फत निकाल लागल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत म्हणजेच दिनांक २१.०१.२०१७ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात पाठविण्यात यावा. निकालाबद्दल जर काही तक्रारी असतील तर अशा तक्रारी दिनांक २१.०१.२०१७ पर्यंत **संबंधित केंद्रामार्फतच** या कार्यालयात पाठविण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत **दिनांक २१.०१.२०१७ नंतर आलेल्या तक्रार / निकाल पडताळणी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.** त्याचप्रमाणे अर्ज सादर करतांना त्यात तक्रारी बाबतचा संपूर्ण तपशिल देण्यात यावा. अपूर्ण तपशिलाचे तक्रार अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

४. **केंद्रावरील सहभागी शाळा किंवा संबंधित विद्यार्थी अगर विद्यार्थ्यांचे पालक यांनी परस्पर या कार्यालयाकडे तक्रार अर्ज अथवा निकाल पडताळणीसाठी अर्ज सादर करु नयेत. त्यांनी केंद्र प्रमुखामार्फतच (मुख्याध्यापक) परीक्षा नियंत्रकांना अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची स्पष्ट सूचना आपल्या स्तरावर संबंधितांना / पालकांना देण्यात यावी.**

५. शासकीय रेखाकला परीक्षा २०१७ मध्ये ज्या परीक्षा केंद्रातील परीक्षार्थी सदर परीक्षेत गुणवत्ता यादी (गुणवत्ता क्रमांक ०१ ते १००) मध्ये किंवा विषयागणिक गुणानुक्रमाने (०१ ते १०) मध्ये निवडून आलेले आहेत. अशा केंद्रांना संपूर्ण गुणवत्ता यादी सोबत देण्यात आलेली आहे. तसेच गुणवत्ता यादी www.doa.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची नोंद घेण्यात यावी.

(सुरेश म.पवार)
प्र.परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

सोबत :- शासकीय रेखाकला परीक्षा २०१७ च्या
परीक्षा शुल्काची पावती व प्रपत्रे.